# व्हीपीपीएलतर्फे वाढवणच्या युवकांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमाचे उद्घाटन

मुंबई, डिसेंबर **16, 2024:** वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल), भारताच्या 13व्या प्रमुख बंदराने, वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमाच्या शुभारंभाची घोषणा केली आहे. हा कार्यक्रम वाढवण भागातील युवकांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याच्या उद्देशाने सोमवार, 16 डिसेंबर 2024 रोजी सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात जेएनपीए (व्हीपीपीएलमधील प्रमुख भागधारकांपैकी एक) आणि डायरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंग (डीजी शिपिंग) यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरीने झाली. या सामंजस्य करारानुसार निवडलेल्या मॅरिटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्स (एमटीआय) च्या माध्यमातून वाढवण भागातील स्थानिक आणि प्रकल्पग्रस्त लोकांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाणार आहे.

हा सामंजस्य करार वाढवण पोर्ट परिसरातील स्थानिक युवकांना जीपी रेटिंग आणि मेरीटाईम कॅटरिंग प्रमाणपत्रसारख्या मान्यताप्राप्त मेरीटाईम पात्रता प्रदान करून सागरी क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी सक्षम करतो. जेएनपीएच्या सीएसआर निधीतून समर्थित, या उपक्रमासाठी प्रत्येकी ₹२-३ लाखांचा अंदाजे खर्च अपेक्षित असून यात प्रशिक्षण शुल्क, निवास व्यवस्थेचा समावेश आहे. डीजी शिपिंग आणि मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्स (एमटीआय) यांच्या सहयोगाने, हा कार्यक्रम उच्च-गुणवत्तेचे प्रशिक्षण, ज्यामध्ये जहाजावर काम करण्याचा अनुभवही समाविष्ट आहे, प्रदान करतो. यामुळे सागरी क्षेत्रात शाश्वत करिअर मार्ग निर्माण होण्यास मदत होईल तसेच भारताच्या वाढत्या सागरी कामगार शक्तीमध्ये योगदान मिळेल.

तसेच व्हीपीपीएल आणि वाढवण येथील डाई मेकर्स असोसिएशन यांच्यात एक सामंजस्य करार करण्यात आला. या करारादवारे डाई मेकर्स असोसिएशनला विशेष ब्रँडिंग संधी प्रदान केल्या जातील, ज्यामध्ये त्यांच्या जाहिराती आणि प्रचार साहित्यासाठी प्रमुख प्रदर्शन क्षेत्राचा वाटा देणे समाविष्ट आहे. या संधी व्हीपीपीएल ज्या महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये आणि प्रदर्शनांमध्ये सहभागी होईल, त्याठिकाणी उपलब्ध असतील, ज्यामुळे उद्योग क्षेत्रात असोसिएशनच्या लोकप्रियतेत मोठी वाढ होईल.

डाई मेकर्सना समर्थन देण्यासाठी जेएनपीए, युनियन बँक ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने क्लस्टर-विशिष्ट योजना प्रस्तावित करते, ज्यामध्ये सवलतीच्या व्याजदरासह आकर्षक व्याज अनुदान योजना समाविष्ट आहे. यामुळे कारागीरांना कमी खर्चात निधी मिळेल, जे त्यांना सुधारित यंत्रसामग्रीत गुंतवणूक करण्यास आणि व्यवसायाचा विस्तार करण्यास सक्षम करेल. यासोबतच, ऑटोमेशन, एआय, आणि ऑटो कॅड व सीएनसी मशीनसारख्या प्रगत साधनांवरील प्रशिक्षण कार्यक्रमांदवारे तंत्रज्ञान उन्नतीवर भर दिला जाईल, ज्यामुळे उत्पादनक्षमता आणि स्पर्धात्मकता वाढेल. बाजार प्रवेश सुधारण्यासाठी ब्रँडिंग आणि थेट बाजाराशी जोडणाऱ्या प्लॅटफॉर्म्सची निर्मिती केली जाईल, जे दलालांवरील अवलंबित्व कमी करतील आणि जागतिक संधी उपलब्ध करून देतील. सामाजिक सुरक्षा उपायांमध्ये शैक्षणिक कार्यक्रम, सुधारित आरोग्य सुविधा, आणि समग्र विमा योजना (अपघाती, टर्म आणि आरोग्य कवच) समाविष्ट आहेत, ज्यांचे प्रीमियम जेएनपीएद्वारे पूर्णपणे भरले जातील, ज्यामुळे

तिहेरी विमा फायदे मिळतील. याशिवाय, पायाभूत सुविधा विकासाला प्राधान्य दिले जाईल, ज्यामध्ये सुधारित रस्ते कनेक्टिव्हिटी आणि सतत विजेचा पुरवठा सुनिश्चित केला जाईल, ज्यामुळे अखंड कार्यक्षमता साध्य होईल.

या उपक्रमाअंतर्गत पहिल्या उपक्रमाच्या रूपाने 'कस्टम दस्तऐवजीकरणासाठी मार्गदर्शन कार्यक्रम' सुरू करण्यात आला आहे, जो स्थानिक युवकांमध्ये रोजगारसिद्धता वाढवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या कार्यक्रमासाठी पत्र बृहन्मुंबई कस्टम ब्रोकर्स असोसिएशन (BCBA) यांना प्रदान करण्यात आले आहे. पात्र विद्यार्थ्यांना पुढे इंटर्नशिपच्या संधी मिळतील.

या उपक्रमाबद्दल बोलताना व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि जेएनपीएचे अध्यक्ष श्री उमेष शरद वाघ, आयआरएस म्हणाले, "महत्त्वपूर्ण सामंजस्य करार आणि वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमाचा प्रारंभ हा सर्वसमावेशक प्रगती आणि समुदाय सक्षमीकरणाच्या आमच्या उद्दिष्टाकडे एक मोठे पाऊल आहे. युवकांना त्यांच्या गरजेनुसार कौशल्ये प्रदान करण्यापासून डाई उत्पादकांसाठी ब्रँडिंग, वित्तपुरवठा आणि प्रगत प्रशिक्षण पुरवण्यापर्यंत हे कार्यक्रम वाढवण परिसरातील दीर्घकालीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक प्रगतीला चालना देण्यासाठी आमची बांधिलकी दाखवतात. सर्वांसाठी समान संधी उपलब्ध असणे आणि सर्वसमावेशक विकास होईल, असे भविष्य निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे."

वाढवणच्या युवकांपर्यंत हा उपक्रम प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी, जेएनपीएने यापूर्वीच 'व्हॉट्सअॅप चॅटबॉट' सुरू केला आहे, जो माननीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री यांच्या उपस्थितीत लाँच करण्यात आला. हा इंटरएक्टिव्ह साधन वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती आणि वाढवण पोर्टशी संबंधित माहिती प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. १२ लाख रोजगार संधी निर्माण करण्याच्या क्षमतेसह, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प समुदाय विकास आणि आर्थिक उन्नतीसाठी जेएनपीएची वचनबद्धता अधोरेखित करतो.

कौशल्य विकास कार्यक्रमात १८ विविध अभ्यासक्रम समाविष्ट आहेत, आणि सहभागींना अन्य संबंधित प्रशिक्षण क्षेत्रांमध्ये त्यांची पसंती दर्शविण्याचे अतिरिक्त पर्याय उपलब्ध आहेत. या सर्वसमावेशक दृष्टिकोणामुळे कार्यक्रम विस्तृत लोकसंख्येच्या आकांक्षा आणि करिअर उद्दिष्टांसाठी अनुरूप आहे.

जेएनपीए आणि व्हीपीपीएल डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासोबत एक सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणार आहेत, ज्याद्वारे दहाणू आणि पालघर तालुक्याच्या निवडक गावांसाठी एक एकात्मिक कृषि आणि बागायती योजना तयार आणि अंमलात आणली जाईल. हे उपक्रम वाढवण पोर्ट प्रकल्पाच्या परिसरातील स्थानिकांची कल्याणकारी कार्यक्रमामध्ये समाविष्ट असतील.

तसेच, मच्छिमारांच्या समुदायाला समर्थन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मच्छिमारांच्या नुकसान भरपाई धोरण तयार केले जात आहे. याशिवाय, दोन मच्छीमारी बंदरांच्या बांधकामासाठी सुमारे ₹३०० कोटींचा निधी दिला जाणार आहे. मच्छिमार नुकसान भरपाई धोरण हे

समुदायाच्या कल्याणाबाबत व्हीपीपीएलच्या बांधिलकीचे एक उदाहरण आहे, जे पायाभूत सुविधांच्या विकासासोबत जोडले गेले आहे.

भारी वाहन चालक प्रशिक्षण आणि मेकॅनिकल प्रशिक्षण देखील एनजीओसह भागीदारी करून सुरू आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून, कुशल चालक कठोर प्रशिक्षण घेत आहेत, त्यांचे परवाने मिळवत आहेत, आणि स्थानिक रोजगार संधी प्राप्त होत आहेत.

वाढवण पोर्ट जागतिक दर्जाचे पोर्ट बनण्याच्या दिशेने प्रगती करत असताना, व्हीपीपीएल वाढवण पोर्ट कौशल्य विकास कार्यक्रमासारख्या नवोन्मेषी उपक्रमांद्वारे समुदाय सक्षमीकरणाला प्राधान्य देत राहील.

व्हीपीपीएल बद्दल:

वाढवण पोर्ट, जो महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यात दहाणूच्या जवळ स्थित आहे, भारताचे १३वे आणि सर्वात मोठे कंटेनर पोर्ट बनण्याची क्षमता आहे. हे एक लँडलॉर्ड मॉडेल अंतर्गत विकसित केले जात आहे, ज्यामध्ये टर्मिनल्स सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) द्वारे बांधले जात आहेत. प्रकल्पाला १९ जून २०२४ रोजी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली, व त्याचे बांधकाम दोन टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे.

धोरणात्मक पद्धतीने स्थानिक, प्रमुख आंतरिक क्षेत्रांशी उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी असलेले वाढवण बंदर त्याच्या सर्व-हवामान अनुकूलतेमुळे आणि नैसर्गिक खोलीमुळे भारताच्या सागरी अर्थव्यवस्थेला सागरमाला उपक्रमांतर्गत चालना देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

वाढवण पोर्ट हे १००% ग्रीन पोर्ट असेल, आणि त्याच्या कार्यप्रणालीत सुरुवातीपासूनच टिकाऊ आणि पर्यावरणपूरक साधनांचा समावेश केला जाईल.

मीडिया चौकशीसाठी संपर्क:

अंबिका सिंग,
डीजीएम (कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स व ट्रेनिंग),
वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड
मोबाईल क्र.: +919920372677
ई-मेल: ambikasingh@jnport.gov.in